# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र.: विकमं/२०१३–१४/३९१ दिनांक : २३/०९/२०१३.

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक,**

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:– नोडल अधिकारी (Nodel Officer) म्हणून नियुक्ती करणेबाबत.....**

महोदय/महोदया,

भारत निवडणूक आयोगाने आगामी सार्वत्रिक निवडणुका २०१४ च्या पार्श्वभूमीवर मतदारमध्ये जागृती करणे व त्यांचा निवडणुक प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने व्हीप –२ या कार्यक्रमाची अमंलबजावणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील १८ ते १९ वयोगटातील निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविण्यासाठी तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची छायांचित्रांसह मतदार यादीमध्ये नावं नोंदणी मोठया प्रमाणात होईल याकडे प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालये व विद्यार्थी यांच्यामध्ये दुवा म्हणून कार्य करावयाचे आहे.

राज्यातील प्रत्येक अकृषि विद्यापीठांच्या अंतर्गत संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्राचार्य अथवा वरिष्ठ प्राध्यापक यांची या कामकाजासाठी **'नोडल अधिकारी (Nodel Officer)'** म्हणून नेमणूक करण्यात यावी, हि विनंती.

या नोडल अधिकाऱ्यांमार्फत महाविद्यायातील युवकांमध्ये निवडणूकीच्या संदर्भात जागृती करण्याचे काम करुन घ्यावे. तसेच भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने वेळोवेळी विहित कार्यवाही करण्याची तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाला आवश्यक ते सहकार्य देण्याची जबाबदारी ही संबंधित नोडल अधिकारी याची राहील.

सदर माहिती जिल्हा निवडणुक अधिकारी यांना कळविणे आवश्यक असल्यामुळे **आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थमध्ये नियुक्त नोडल अधिकारी (Nodel Officer) यांची माहिती सोबत जोडलेल्या प्र–पत्रात आपल्या जिल्हयांच्या जिल्हा निवडणुक अधिकारी व मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे–०७ या दोन्ही कार्यालयांना त्वरित कळवावी, हि विनंती.**

कळावे,

सोबत : वरीलप्रमाणे.

पुणे-४११००७. पुणे विद्यापीठ

23/9/13

संचालक,

विद्यार्थी कल्याण मंडळ

महाविदयालयाचे नांव

| अ.नं | नोडल अधिका-याचे नांव | पदनाम | दुरध्वनी क्रमांक | ई मेल ॲड्रेस |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |